सादरकर्ता अधिका-याची नेमणूक करणेबाबत
श्री.अतिष दादासाहेब आखाडे से.नि.ग्रामसेवक
ग्रामपंचायत भावडी पंचायत समिती श्रीगोंदा
यांचे गैरर्वतना बाबत.

जिल्हा परिषद अहमदनगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जिल्हा परिषद आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ १७९ /२०२४
अहमदनगर, दिनांक - १५/०४/२०२४

संदर्भ :- १. गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील पत्र क्र. आस्था-१/५०३/२०२३ दिनांक १३/०४/२०२३

२. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र /ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/३७८/२०२३, दिनांक- २२/०५/२०२३

३. या कार्यालयाचे आदेश क्र.साप्रवि-२/ग्रांप-३/३७६/२०२३ दिनांक २२/०५/२०२३(सेवानिलंबन)

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(३)

५. या कार्यालयाचे आदेश क्र.साप्रवि-२/ग्रांप-३/१७८/२०२४ दिनांक १५/०४/२०२४(चौकशी अधिकारी नियुक्ती )

ज्या अर्थी, श्री.अतिष दादासाहेब आखाडे सेवानिलंबित तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत भावडी पंचायत समिती श्रीगोंदा येथे कार्यरत असताना ग्रामपंचायत कामकाजात गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द संदर्भ क्र.१ अन्वये, गट दोषारोप प्राप्त झालेले आहेत. संदर्भ क्र. २ नुसार तयार करण्यात आलेले दोषारोप पत्र आरोप क्रमांक १ ते ०६ श्री.अतिष दादासाहेब आखाडे ग्रामसेवक, यांना दिनांक १९/०१/२०२४ रोजी बजावले असून त्यांनी दोषारोपांबाबत खुलासा सादर केलेला आहे. तथापी सर्व आरोप अमान्य असल्याचे खुलाश्यामध्ये नमुद केलेले आहे. सबब, त्यांचे विरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार श्री.अतिष दादासाहेब आखाडे, सेवानिलंबीत ग्रामसेवक, यांचे विरुध्द संदर्भ क्र.५ अन्वये चौकशी करणे कामी चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदरच्या चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या नियमातील तरतुदी लागू राहतील.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ (५) अन्वये, जिल्हा परिषदेच्या वतीने या प्रकरणी बाजू मांडण्याकरीता सादरकर्ता अधिकारी म्हणून श्री.मोहसीन अस्लम मालजप्ते ,विस्तार अधिकारी,(सांख्यिकी) पंचायत समिती श्रीगोंदा यांची नेमणूक करणेत येत आहे.

Scanned with OKEN Scanner

अधिकारी यांचे सूचने व आदेशाप्रमाणे चौकशीच्या दिवशी हजर ठेवणे बाबतचे व इतर कामकाज करावे या कामी दिरंगाई व टाळाटाळ झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202404150600067 असा आहे.

(आशिष येरेकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

श्री.मोहसीन अस्लम मालजप्ते ,विस्तार अधिकारी,(सांख्यिकी)
व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा
२/- सदर आदेशाची एक प्रत संबंधितांस बजावून दुस-या प्रतीवर स्वाक्षरी घेवून पोहच या कार्यालयास पाठविण्यात यावी.
प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा
प्रत :- श्री.अतिष दादासाहेब आखाडे सेवानिलंबित ग्रामसेवक मुख्यालय अकोले
व्दारा :-गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले
प्रत :- सहा. आयुक्त, (चौकशी), विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक
प्रत :- निवड नस्ती.

(आशिष येरेकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहमदनगर

Scanned with OKEN Scanner